अक्षयतृतीया या सणाच्या निमित्ताने

# भगवान श्रीकृष्णांची अक्षय कृपा

## महाभारतातील एका कथेवर आधारित

आपला ज्येष्ठ भ्राता धर्मराज युधिष्ठिर याच्या नेतृत्वाखाली असलेले, नीतिपरायण असे पांडव बंधू हस्तिनापूर साम्राज्याचे न्यायसंगत उत्तराधिकारी होते. परंतु, त्यांचा मत्सरी चुलत भाऊ दुर्योधन याच्या कपटीपणामुळे त्यांना बारा वर्षांसाठी देशातून हद्दपार करून वनवासात पाठवले गेले होते.

अनेक निष्ठावंत ऋषीदेखील पांडवांसह वनवासात गेले. धर्मराज युधिष्ठिराला हे समजत नव्हते की, आपला परिवार आणि ऋषींचे पालनपोषण करण्याचे त्यांचे दायित्व ते कसे निभावणार होते? धर्मराज युधिष्ठिराने सूर्यदेवाकडे वरदान प्राप्त करण्यासाठी प्रार्थना केली. युधिष्ठिराची प्रार्थना ऐकून सूर्यदेव आकाशातून त्याच्यासमोर प्रकट झाले. त्यांचे कवच सोनेरी प्रभेचे होते आणि त्यांच्या हातात सूर्याइतकाच चमकदार आणि तेजस्वी असा एक अद्भुत प्याला होता, ते अक्षय पात्र होते.

सूर्यदेव म्हणाले “हे! ज्येष्ठ पांडू पुत्रा, या दिव्य पात्राचा स्वीकार कर. हे ईश्वराच्या अक्षय कृपेचे प्रतीक आहे. या पात्रातून तुला आणि तुझ्या भावंडांना नित्य भोजन प्राप्त होईल. तुझ्या पत्नीने, द्रौपदीने सर्व ऋषींना भोजन देण्याची सेवा करावी. आणि तुम्ही सर्वांनी भोजन केल्यानंतरच शेवटी तुमच्या पत्नीने, द्रौपदीने आपले भोजन ग्रहण करावे, जशी आपली परंपरा आहे. मी तुला वचन देतो की, अशा रीतीने भोजन केल्यास, तुम्हाला कधीही उपाशी राहावे लागणार नाही.”

सूर्यदेवाने दिलेल्या उपहाराकरता पांडव त्यांच्याप्रति कृतज्ञ होते आणि दररोज आपले भोजन अक्षय पात्राद्वारे ग्रहण करून त्यांच्या आदेशाचे पालन करत होते. पांडवांचे आणि सर्व ऋषींचे भोजन झाल्यानंतरच द्रौपदी आपले भोजन करत असे. त्यानंतर दुसऱ्या दिवशीची सकाळ होईपर्यंत ते पात्र रिकामे राहत असे, तोपर्यंत की जोवर त्यात आश्चर्यकारकरित्या पुन्हा भोजन येत नसे.

अक्षय पात्राविषयीची माहिती जेव्हा हस्तिनापुरला पोहोचली, तेव्हा दुष्ट दुर्योधनाचा रागाने तीळपापड झाला. त्याने पांडवांच्या विरूद्ध चाल रचली. अनेक आठवड्यांपासून तो दुर्वास मुनी, जे एक तेजस्वी ऋषि होते, त्यांच्याप्रती आदरभाव, सन्मान प्रकट करत होता. त्यांच्याकडून वरदान प्राप्त व्हावे या आशेने, तो त्यांच्यासह त्यांच्या दहा हजार शिष्यांकरता भोजनाचा प्रबंध करत राहिला होता. दुर्वास मुनी त्यांच्या तापट स्वभावासाठी जगभर प्रसिद्ध होते. त्यांचा किंचितसाही अवमान झाला तरी ते लगेच शाप देत असत. राजे-महाराजे तसेच देवी-देवता त्यांच्या क्रोधाला समान रूपाने घाबरत असत. तरीदेखील दुर्योधनाच्या सेवेमुळे दुर्वास मुनी संतुष्ट झाले आणि म्हणाले, “मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तू जे मागशील, ते तुला दिले जाईल.”

आपल्या शत्रूंचा विनाश करण्याच्या आशेने उतावीळ झालेला दुर्योधन याच क्षणाची प्रतीक्षा करत होता.

तो हे जाणून होता की, ऋषींचे स्वागत एका अतिथीच्या रूपात करण्यास आणि त्यांच्या शिष्यांना भोजन देण्यास पांडव असमर्थ आहेत. याच्या फलस्वरूप दुर्वास मुनी संपूर्ण परिवाराला निश्चितच शाप देतील.

दुर्योधन वाकून नम्रतापूर्वक दुर्वास मुनींना म्हणाला, “हे महर्षी! हे योगीराज! माझी अशी इच्छा आहे : वनातील पांडवांनाही कृपया दर्शन द्यावे. ते माझे प्रिय मित्र आहेत आणि अतिशय धर्मशील आहेत. आपल्या दर्शनाने ते अतिशय प्रसन्न होतील. कृपया, द्रौपदीचे जेवण झाल्यानंतर आपण तिथे जावे, जेणेकरून ती चांगल्या रीतीने तुमची सेवा करू शकेल.” ऋषींनी याला सहमती दर्शविली आणि दुसऱ्याच दिवशी ते आपल्या दहा हजार शिष्यांसह पांडवांच्या कुटीच्या दिशेने मार्गस्थ झाले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ऋषींना येताना पाहून, धर्मराज युधिष्ठिर त्यांच्या स्वागतासाठी आपल्या भावंडासह त्यांना सामोरा गेला. या महान ऋषींचे स्वागत करण्याच्या गडबडीत युधिष्ठिरला याची आठवण राहिली नाही की, द्रौपदीने नुकतेच तिचे जेवण संपवले होते. त्याने हात जोडून दुर्वास ऋषींचे स्वागत केले आणि तो म्हणाला, “हे ऋषिवर! कृपया नदीत स्नान करावे, आणि त्यानंतर तुम्हाला आणि तुमच्या शिष्यांना भोजन देणे हे आमचे सौभाग्य असेल.”

राजकुमारी द्रौपदी, अतिथींचे स्वागत करण्यासाठी कुटीतून बाहेर आली. धर्मराज युधिष्ठिराने दिलेल्या आमंत्रणाविषयी ऐकताच ती भयचकित झाली. अक्षय पात्र तर रिकामे झाले होते! भुकेलेले ऋषी आणि

त्यांचे शिष्य यांना भोजन देता येणे आता अशक्य होते. दुर्वास मुनी आता निश्चितच त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला शाप देतील.

द्रौपदी धावतपळत आपल्या कुटीत गेली आणि गुढघे टेकून बसली, अतिशय व्याकुळतेने ती भगवान कृष्णांची स्तुती करू लागली.

“हे श्रीकृष्ण,
आपली शक्ती अपरंपार आहे,
आपण पीडितांचे कर्मठ नायक आहात,
समस्त विश्वाचे आणि सृष्टीचे रक्षणकर्ते व पालनकर्ते आहात,
आपण महानाहून महानतम आहात, सर्वांचे सर्वोत्कृष्ट आश्रय आहात!
हे देवतांच्या देवा, आपल्याला शरण आल्यानंतर
सर्व भयांपासून मुक्ती मिळते
आपण याआधीही अनेकदा माझे रक्षण केले आहे
या संकटापासून आपणच माझे रक्षण करा.”

द्रौपदीची प्रार्थना ऐकून भगवान कृष्ण तत्काळ तिच्यासमोर प्रकट झाले. ते समस्त दिव्य लोकांसमान तेजोमय होते तसेच ते सत्याचे आणि धर्माचे मूर्तरूप होते. त्यांनी शांत आणि स्नेहपूर्ण स्वरात द्रौपदीला सांगितले, “मला खूप भूक लागली आहे ! घाई कर ! माझ्यासाठी काहीतरी खायला घेऊन ये!”

द्रौपदी भयचकित झाली आणि प्रार्थना करू लागली, “परंतु हे प्रभू, इथे तर काहीच अन्न शिल्लक नाही! अक्षय पात्र रिकामे आहे, आणि दुर्वास मुनी आमच्यावर रागावतील! कृपया मला साहाय्य करा!”

भगवान कृष्णाने तिला पुन्हा आदेश केला, “घाई कर, घाई कर! माझ्या पोटात भुकेने कावळे कोकलू लागले आहेत. सूर्य देवाचे पात्र माझ्याकडे घेऊन ये! त्यात काही ना काही नक्कीच शिल्लक राहिले असेल.

द्रौपदीने विचार केला, “भगवंतावर पूर्ण विश्वास ठेवणे आणि त्यांच्या आज्ञेचे पालन करणे हा माझा धर्म आहे. ते तर अप्रत्यक्षाला प्रत्यक्ष रूपात पाहतात आणि अशक्याला शक्य बनवतात. मी स्वतःलाच

त्यांच्या आज्ञेप्रति समर्पित करते आहे." तिने वाकून प्रणाम केला आणि तिने अक्षय पात्र आणून भगवान श्रीकृष्णांना दिले. भगवान श्रीकृष्णाने पात्राच्या काठांवर आपली बोटे फिरवली. मग त्यांनी द्रौपदीकडे पाहून स्मितहास्य केले आणि त्यांनी आपले बोट काढले; त्यावर तांदुळाचा एक दाणा चिकटलेला होता. त्यांनी अतिशय चवीने, मोठ्या आनंदाने तो दाणा खाल्ला. मग ते उद्गारले, "श्रीहरी, जो ब्रह्मांडाचा आत्मा आहे, तो या भेटीमुळे तृप्त होवो."

भीम जो पांडवांमध्ये सर्वात बलशाली होता, तो ही दिव्य लीला पाहात होता. भगवान श्रीकृष्णांनी त्याच्याकडे वळत म्हटले, "लवकर जा आणि दुर्वास मुनी तसेच त्यांच्या शिष्यांना भोजन ग्रहण करण्यासाठी बोलावून आण."

याच दरम्यान नदीत स्नान करणाऱ्या दुर्वास मुनी आणि त्यांच्या शिष्यांची भोजनाची इच्छा अचानक नाहीशी झाली. एका शिष्याने विचारले, "हे महर्षी, आता आपण काय करायचे? आपले पोट तर गळ्यापर्यंत भरल्यासारखे वाटते आहे. पांडवांकडे भोजन करणे आता सर्वथा असंभव आहे." ऋषींनी उत्तर दिले, "एकदा आमंत्रण स्वीकारल्यानंतर ते पुन्हा नाकारण्याची एक गंभीर चूक आपण करत आहोत. युधिष्ठिर आणि त्याचे बंधू धर्मशील तर आहेतच, परंतु ते योद्धेदेखील आहेत. या चुकीच्या वर्तणुकीने ते क्रोधित होतील. ते परत येण्यापूर्वीच आपण इथून निघून गेले पाहिजे."

भगवान श्रीकृष्णांच्या निर्देशानुसार, भीम नदीवर गेला आणि त्याने असे पाहिले की, दुर्वास मुनी आणि त्यांचे शिष्य तातडीने पांडवांच्या कुटीपासून दूर पळून जात आहेत. युधिष्ठिराने आपल्या लहान भावाला विचारले की, हे सर्व कसे शक्य झाले. तेव्हा भीमाने त्यांना भगवान श्रीकृष्णांच्या लीलेबाबत सांगितले. पांडव तत्काळच, आपल्या श्रीगुरूंच्या, श्रीकृष्णांच्या दर्शनासाठी आणि आपली कृतज्ञता अभिव्यक्त करण्यासाठी आपल्या कुटीत गेले.

धन्य आहेत प्रभू! मनमोहक हास्यासह श्रीकृष्णाने सर्वांचे स्वागत केले. द्रौपदीने सांगितले की, भगवान श्रीकृष्ण तिथे कसे प्रकट झाले आणि कशा प्रकारे त्यांनी अक्षय पात्रात उरलेल्या भाताच्या शीताचा आस्वाद घेतला. कृतज्ञतेने पांडवांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि ते भगवान श्रीकृष्णांसमोर नतमस्तक झाले.

भगवान श्रीकृष्णांनी सांगितले, "द्रौपदीच्या करुण प्रार्थनेमुळेच मी इथे उपस्थित झालो आहे. भाताच्या एका दाण्याची तिची भेट जरी अतिशय साधारण असली, तरी तिच्या विश्वासाने आणि भक्तीने मी प्रसन्न

झालो आहे. माझ्यावर तिचा अढळ विश्वास होता. जेव्हा एखादी व्यक्ती प्रेमाने केलेल्या आपल्या कार्याला ईश्वराप्रती समर्पित करते, तेव्हा तिच्या या लहानात लहान सत्कर्मातदेखील अनेक लोकांचा उद्धार करण्याची शक्ती असते.

"द्रौपदीने, तुम्हा पांडवांप्रमाणेच आपल्या स्वधर्माचा निर्वाह केला आहे. हे सदैव लक्षात असू द्या की, अक्षय पात्राप्रमाणेच ईश्वराची कृपादेखील शाश्वत आणि अनंत आहे. आणि जो धर्मात्मा ईश्वराला शरण जातो, तो निश्चितच विजय प्राप्त करतो. यशस्वी भव!"

युधिष्ठिराने भगवान श्रीकृष्णांना सांगितले, "हे प्रभू! आपण शांतीचे स्त्रोत आहात तसेच सौभाग्याचे निवासस्थान आहात. तुम्हाला आमचे वारंवार प्रणाम. आम्ही सदैव हृदयपूर्वक आपले स्मरण करत राहू!"

समस्त प्राण्यांचे अस्तित्व अनंत ईश्वरातच आहे. खरोखरच, भगवान कृष्ण तांदळाच्या फक्त एकाच शीताने संतुष्ट झाले आणि त्यामुळे दहा हजार लोकांची भूक मिटली आणि अप्रत्यक्षपणे पांडवांचे रक्षण झाले.

***

## अक्षयतृतीयेविषयी

परंपरेने, सूर्यदेवांनी अक्षयतृतीयेच्या दिवशीच पांडवांना दिव्य पात्र दिले होते. अक्षयतृतीया हा दिवस भारतीय पंचांगाच्या साडे तीन पवित्रतम दिवसांपैकी एक आहे. महर्षी वेदव्यासांनी महाभारताच्या रचनेचा आरंभदेखील याच पवित्र दिवशी केला होता. आनंद आणि प्रचुरतेचा हा समय नवीन उपक्रम सुरू करण्यासाठी तसेच आध्यात्मिक अभ्यास करण्यासाठी शुभ असतो.

***

पुनर्कथन : मॉरगन हूपर यांच्याद्वारे

भगवान श्रीकृष्णांची पेंटींग शक्तिपुंजच्या अर्काइव्हीज्मधून घेण्यात आले आहे.

डिझाइन : हीरा टैनर यांच्याद्वारे

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.